396 **महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ** G-216

कल्पतरु पाईट इमारत, २ रा मजला,
सिने प्लॅनेट सिनेमासमोर, सायन-माटुंगा
स्किम रोड नं.८, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२

अत्यंत महत्वाचे

जा.क्र.:मप्रनि/विधी व योजना विभाग/ब-2054 दिनांक :30/०३/२००९

## परिपत्रक

विषय : न्यायालयीन प्रकरणे हाताळण्या संबंधीच्या मार्गदर्शक सूचना

संदर्भ : अवर सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र
क्र.आस्था-२००९/१४/का-३, दिनांक २०/२/२००९

--------

अवर सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भांकित पत्रान्वये विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पारित केलेल्या न्यायालयीन प्रकरणांवर वेगवेगळया स्तरावर कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना या विषयाबाबतचा शासन निर्णय क्र.जीपीएच-१०००/(२२८)/का-चौदा, दिनांक ७/११/२००० योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविला आहे. ज्यामध्ये न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अथवा सूचनांची तातडीने अंमलबजावणी करुन, न्यायालयाचा आदेशांचा अवमान होणार नाही याबाबत मार्गर्शक सूचनां दिलेल्या आहेत. सदर शासन निर्णयाची प्रत कृपया आपल्या माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात येत आहे.

तसेच सर्व तांत्रिक अधिकाऱ्यांना ते हाताळत असणाऱ्या विषयांमध्ये दाखल करण्यात आलेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये विशेषत: सार्वजनिक हिताच्या याचिकांमध्ये, स्वत: मप्रनि मंडळाच्या मान्यताप्राप्त वकीलांना योग्य ती माहिती प्रत्यक्षात द्यावी आणि त्याबाबत त्यांच्याशी योग्य ती चर्चा (briefing) देखील करावी . माननीय न्यायाधिपती (श्री.जे.एन.पटेल, प्रभारी मुख्य न्यायाधीश आणि श्री एस.सी.धर्माधिकारी, मा.न्यायाधीश), मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने याचिका क्र.३२/२००६ आणि ४१/२००६ मध्ये दिलेल्या आदेशानुसार संबंधीत तांत्रिक अधिका-यांनी सदरहू याचिकांमध्ये स्वत: मा.न्यायालयांसमोर हजर रहावे. तसेच मंडळाच्या मान्यताप्राप्त वकीलांना योग्य ती सूचना सदरहू प्रकरणांवर सुनावणी होण्यापूर्वी द्याव्यात, असे दिनांक ७/३/२००७ च्या आदेशाद्वारे निर्देशित केलेले आहे.

(सही)
( द. त्रि. देवळे )
वरिष्ठ विधी अधिकारी

सोबत : वरीलप्रमाणे

Correspondance New File to be opened
2004-10
& file it. Give Gen. File No in Register
Devale

प्रत माहितीसाठी सविनय सादर : सदस्य सचिव, मप्रनि मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. जल प्रदूषण निवारण अभियंता (PCI-III)/हवा प्रदूषण निवारण अभियंता/प्रधान वैज्ञानिक अधिकारी(PCI-I)/मुख्य लेखा अधिकारी/प्रोजेक्ट लिडर(झोनिंग ॲटलास), मप्रनि मंडळ. त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांना याबाबत अवगत करावे

२. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी(मध्यवर्ती प्रयोगशाळा,महापे)/वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी/सांख्यिकी अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई- त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांना याबाबत अवगत करावे

३. विधी अधिकारी (श्री भुरे)/विधी अधिकारी (श्री पुरकर), मप्रनि मंडळ, मुंबई.

४. प्रादेशिक अधिकारी -(PCI-II)/घातक घनकचरा व्यवस्थापन (मुख्यालय)/प्रकल्प व योजना/समन्वय/पॅम्स/प्रदूषण नियंत्रण अधिकारी विभाग-२ (PCI-I)/मुंबई/नवी मुंबई/ ठाणे/कल्याण/रायगड/पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर, मप्रनि मंडळ. त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांना याबाबत अवगत करावे

५. सर्व सहाय्यक विधी अधिकारी, विधी व योजना विभाग, मप्रनि मंडळ, मुंबई.